**CNR :- MHSI100003092018**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३८/२०१८ :–

## –: निशाणी ६९ वरील आदेश :–

वादीने प्रस्तुतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. ०९ यांच्या विरुद्ध पारीत झालेला दावा (Abatement) चा आदेश रद्दबातल होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. ९ गणपत बाळा ठाकूर हे दि. २३.०४.२०२१ रोजी मयत झालेले आहेत. सदर प्रतिवादी कोरोना महामारीच्या कालावधीत मयत झालेले असल्याने त्यांचे वारस वेळीच अभिलेखावर दाखल करणे वादीस अडचणीचे झाले होते. त्यामुळे प्रतिवादी क्र. ९ विरुद्ध दावा अबेट झालेला आहे. सदर प्रतिवादी यांना वारस असल्याने प्रतिवादी क्र. ९ च्या वारसांविरुद्ध दावा चालणारा आहे. सदर दाव्याच्या न्यायपुर्ततेकामी प्रतिवादी क्र. ९ चे वारस अभिलेखासदरी सामील करणे आवश्यक आहे. सबब प्रतिवादी क्र. ९ विरुद्ध पारीत झालेला अबेटमेंटचा आदेश रद्दबातल करण्यासाठी वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाचे कामी प्रतिवादी क्र. ९ चे वारसांतर्फे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी क्र. ९अ यांनी म्हणणे दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास तीव्र विरोध दर्शविला आहे. प्रतिवादी क्र. ९अ चे म्हणण्यानुसार सदर अबेटमेंटचा आदेश रद्दबातल

करण्यासाठी दिलेले कारण हे समाधानकारक नाही आणि म्हणुन सदरचा आदेश रद्दबातल होणेस पात्र नाही त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याबाबत विनंती केली आहे. प्रतिवादी क्र. ९क याने, प्रतिवादी क्र. ९अ चे म्हणणे स्वीकृत करत असलेबाबतची पुरशीस नि.क्र. ७७ वर दाखल केलेली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. प्रतिवादी क्र. ९ चा मृत्यू दि.२३.०४.२०२१ रोजी झाल्याचे नि.क्र. ६८/1 वरील दाखल मृत्युपत्रावरुन दिसून येते. दाव्याचे स्वरुप पाहता दावा मिळकती संदर्भात प्रतिवादी क्र. ९ चे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. ९ चे वारसांनी अर्जास आक्षेप नोंदविला आहे. परंतु त्यांनी अर्जाच्या अनुषंगाने दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन करता त्यांनी कुठेही प्रतिवादी क्र. ९ चे वारस असल्याचे नाकारलेले नाही. प्रस्तुतचा अर्ज दि. १०.११.२०२१ रोजी दाखल केलेला आहे. वारस अभिलेखावर आणण्यासाठी विलंब झालेला आहे. वादीने अर्जात नमुद केलेले कारण समाधानकारक नाही. वादीच्या या कृत्यामुळे न्यायालयाचा अमुल्य वेळ वाया गेलेला आहे. अर्ज नामंजूर झाल्यास अर्जाच्या अनुषंगाने विविध कायदेशीर कामे चालविण्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी न्यायाच्या कारणे प्रतिवादी क्र. ९ यांचे विरुद्धचा अपशमन (Abatement) आदेश रद्दबातल करण्यासाठी खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन करणे मला उचित वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश करणेत येत आहे.

## –:: <u>आदेश</u> ::–

१. रक्कम रु. ३००/– (रुपये तीनशे मात्र) खर्चाचे आदेश करुन निशाणी ६९ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र. ९ यांचेविरुद्ध दावा रद्द/अपशमन (Abatement) आदेश, खर्चाची रक्कम रु. ३००/– (रुपये तीनशे मात्र) भरल्यानंतर रद्दबातल करण्यात येत आहे.

३. सदरची रक्कम रु.३००/– (रुपये तीनशे मात्र) मोफत विधीसेवा प्राधिकरण (Free Legal Aid) कडे जमा करणेत यावी.

Digitally signed by YASHODHAN PRADIP BAVKAR
Date: 2023.02.08 10:58:57 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – ०७.०२.२०२३ दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) दोडामार्ग.